विदर्भाची शान, महाराष्ट्राचा मान

पूर्व विदर्भ

तरुण भारत

गुरुवार, १ एप्रिल २०१०

शेवटचे पान

# पुणे-मुंबई म्हणजे महाराष्ट्र नव्हे : आ. देशमुख

## उद्योजकांनी विदर्भात उद्योग उभारावे

प्रतिनिधी

वर्धा, ३१ मार्च

महाराष्ट्र म्हणजे केवळ मुंबई, पुणे नव्हे तर विदर्भातही नवीन उद्योग उभारण्याला वाव आहे आणि त्याकरिता विदर्भ सक्षम आहे. उद्योजकांनी विदर्भाकडे लक्ष देऊन उद्योग उभारले पाहिजे, असे प्रतिपादन आ. सुरेश देशमुख यांनी केले.

मुंबई येथील लिबरेशन स्कूल ऑफ बिझनेस मॅनेजमेंटच्या वतीने लघु व मध्यम उद्योगाकरिता विविध पदविका अभ्यासक्रम चालविल्या जातात. या अभ्यासक्रमाच्या अकराव्या तुकडीच्या दीक्षांत समारोह मुंबई येथील चर्चगेट येथे नुकताच झाला त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला बड्या उद्योजकांची उपस्थिती होती. आ. देशमुख पुढे म्हणाले , विदर्भ हा उद्योगाकरिता सर्वसंपन्न असा प्रदेश आहे. उद्योगाकरिता लागणाऱ्या वाहतुकीच्या सोयी, रेल्वेचे जाळे, हवाई मार्ग, तांत्रिक मनुष्यबळ असे सर्व असताना उद्योजकांनी केवळ मुंबई, पुण्याचा विचार करू नये. त्या पलिकडे उद्योग विस्तीर्णकरिता पाऊले टाकायला पाहिजेत. विदर्भातील काही जिल्ह्यात उद्योग नावालाही नाहीत अशा ठिकाणी उद्योजकांनी सर्वेक्षण करून उद्योग उभारले पाहिजे. विदर्भात उद्योग नसल्याने बेकारी वाढते आहे. विदर्भातील तरुण हुशार आहेत त्यांच्या हाताला कामे मिळाली पाहिजेत, असे सांगून विदर्भात या असे आवाहन त्यांनी उद्योजकांना केले. तर लिबरेशन स्कूल ऑफ फॅमिली बिझनेस मॅनेजमेंटचे संचालक अमोल मुडे यांनी नव उद्योजकांना विदर्भात उद्योग उभारण्यास निश्चित प्रेरणा देऊ असे सांगितले.



मुंबई येथील लिबरेयन कोचेसच्या दीक्षांत समारोहप्रसंगी आ. प्रा. सुरेश देशमुख व विद्यार्थी

कार्यक्रमाला नरेश स्टिल समूहाचे सौरभ शहा, स्लॅकर्टकचे संजू शहा, बलारू शूजचे सावला, निलेश पारे, रजनीकांत गौलका, सुवर्णा लक्ष्मी, विजयालक्ष्मी सुवर्णा, लिबरेशन स्कूल ऑफ फॅमिली बिझनेस मॅनेजमेंटचे अधिकारी उपस्थित होते.